International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# पंडित नेहरू : राजकीय विचार


## सह. प्रा. एम. एस. देशमुख

कै. सौ. कमलताई जामकर
महिला महाविद्यालय परभणी


**गोषवारा:**

"मानवतेचा एक महान पुजारी आणि भारताचा एक अद्वितीय नेता आज आमच्यातून नाहीसा झाला आहे" अशा, शब्दात आचार्य अत्रेंनी वर्णन केले आहे. कारण आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शांतता आणि प्रगती या मानवतेच्या अत्युच्च ध्येयासाठी आपले सर्वस्व त्यांनी वेचले होते. नेहरू हे फक्त राष्ट्रपुरुषच नव्हे तर विश्वपुरुष होते. जीवंतपणी जयजयकार आणि मृत्यूनंतर चहुकडे हाहा:कार अशी विश्वप्रियता पं. नेहरून एवढी क्वचितच यापूर्वी जगातील कोणत्याही महापुरुषाला लाभली असेल,बुद्धी आणि भावना यांचा समतोल नेहरुंच्या व्यक्तीमत्वामध्ये स्वभावतःच साधला होता. त्याचे प्रतिबिंब स्वतंत्र भारताच्या राष्ट्रीय धोरणामध्ये आज उमटलेले दिसते. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यकुशलतेचा ठसा उमटविला सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून देशाचा विकास केला जावा यावर नेहरूंचा भर होता.

देशाचा राजकीय विकास करायचा असेल तर अगोदर सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणला पाहीजे अशी त्यांची धारणा होती. जागतिक राजकारणात भारतीय भूमिकेची मुहूर्तमेठ रचण्याचे कार्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू कडून झाले. याठिकाणी एक महत्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे भारतीय भुमिकेला अनुरूप काही परिवर्तने घडून आली असली तरी ज्या मुलभूत तत्वावर भारतीय भुमिकेची झाली ती अदयाप कायम आहे. नेहरूचे राजकीय विचारांचे भारताच्या विकास व आधुनिकतेचा पाया रचनेमध्ये महत्वाचे योगदान ठरते. नेहरूच्या राजकीय विचार लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यावर आधारित आहेत. नेहरूच्या राजकीय विचारामध्ये लोकशाही समाजवाद महत्वाचा ठरतो. कारण लोकशाही समाजवाद हा जनतेला राजकीय व आर्थिक निर्भयता प्रदान करतो. पंडित नेहरूच्या राजकीय विचारांचा अभ्यास करताना खालील मुदद्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

नेहरूचा राजकीय विचाराचा मुलाधार असणारा राष्ट्रीय एकात्मता आणि आधुनिकतेचा दृष्टीकोनाचा अभ्यास करताना खालील बाबींचा विचार करावा लागेल.

**1]भाषिक एकता**

नेहरूंनी फाजल अली हा भाषिक प्रांतवार रचनेच्या अभ्यासाबाबत आयोग नेमला होता, त्यातून विविध भाषा बोलणाऱ्या लोकामध्ये एकतेची भावना निर्माण करण्यासाठी नेहरूंनी भाषिक राज्याची रचना समजून घेतली, पण त्याच वेळी भारताची अखंडता टिकवण्याव भर दिला.

**2)धर्म निरपेक्षता**

भारतामध्ये कोणताही एक धर्म महत्वाचा नसून सर्वधर्म समभाव तत्वाचा स्वीकार नेहरूनी केला. घटनेतील कलम 15 मध्ये नमुद केल्याप्रमाणे भारतातील लोकांमध्ये वंश, लिंग, जात, पंथावरून भेदभाव केला जाणार नाही हा हक्क त्यांनी मान्य केला.

**3)संविधान आणि लोकशाही मुल्ये**

घटनेच्या माध्यमातून सर्व नागरिकांना स्वातंत्र, समता, बहाल केली, लोकशाही पध्दतीचा स्विकार करुन जनतेला राजा बनवले. विविधतेत एकता साधणे यावर त्यांनी भर दिला.

**4)विदेश धोरण**

- **अलिप्ततावादी**

जागतिक स्तरावर शीतयुद्ध चालू असताना नेहरुने अलिप्ततावादाचा स्विकार केला. भारताने कोणत्याही शक्तीगटात सामील न होता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राखले व आपले सार्वभौमत्व सिद्ध केले.

- **पंचशील धोरण**

नेहरुच्या शांततापूर्ण अखंडतावादाचे दर्शन घडवणारे धोरण म्हणजे पंचशील धोरण होय. भारत व चीनमध्ये २१ एप्रिल 1954 ला पंचशील समझोता झाला त्यातील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे.

I. एकमेकाच्या अखंडता आणि सार्वभौमत्वाचा सन्मान करणे.
II. दुसऱ्यांच्या अंतर्गत कारभारात लक्ष न घालणे.
III. ऐकमेंकावर युध्द न करणे.
IV. शांतता व सहकार्यपूर्ण धोरण ठेवणे.
V. समानता व परस्परांच्या लाभ

**5]सामाजिक न्याय**

नेहरुनी सामाजिक न्यायामध्ये फक्त आर्थिक विकासावर भर न देता सर्व नागरिकांच्या समान संधीवर भर दिला, त्यांनी कल्याणकारी राज्याच्या निर्मितीवर भर दिला.

**6)राष्ट्रवाद**

नेहरूचा राष्ट्रवाद म्हणजे देशाची एकता व अखंडता वाढीस लावणारा होता. विविध धर्म, संस्कृतीला सन्मान दिला.

**7) लोकशाही**

भारतात संसदीय लोकशाही शासनपध्दतीचा त्यांनी स्विकार केला. त्याच्यामते लोकशाहीच भारतामध्ये एकता निर्माण करण्यासाण पोषक आहे. सर्व नागरिकांना विचार व सहभागित्वाचे स्वातंत्र त्यांना लोकशाही मार्फत प्रदान केले.

**8) विकासनीती आणि औदयोगिकरण**

नेहरूंनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिकीकरणावर भर दिला. त्यांनी विकासाच्या दृष्टीने म्हणून धरणे, कारखाने व वैज्ञानिक संस्थाची स्थापना केली. पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून नियोजित विकासाचे धोरण राबवले.

**9) समाजवाद-**

नेहरुंनी भांडवलवादी अर्थव्यवस्थेला विरोध केला. समाजातील आर्थिक विषमता. करण्यासाठी गरिबी निर्मूलनासाठी समाजवादी धोरणाचा पुरस्कार केला. यामध्ये त्यांनी सार्वजनिक क्षेत्राला अधिक महत्व दिले.

नेहरूंच्या मते उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेतील उत्पादीत वस्तूंचे वितरण सदोष पध्दतीचे असव्यामुळे संपत्तीची वाढ होऊन सुध्दा गरीब हा गरीबच राहतो. त्यामुळे देशातील दारिद्र नष्ट करायचे असेल उत्पादीत वस्तुचे योग्य प्रकारे वितरण झाले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजवाद अस्तित्वात येऊ शकतो.

## निष्कर्ष

पंडित नेहरूंचे राजकिय विचार भारताला विकासाच्या वाटचालीस प्रोत्साहीत करणारे होते. त्यच्या आधुनिक, वैज्ञानिक, दृष्टीकोनातून भारताला एक नवी उमेद, स्थिर लोकशाही,समानता प्रदान करणारी नवी दिशा देणारी ठरली.

## संदर्भ ग्रंथ

1) नेहरू अँण्ड डेमोक्रसी इन इंडिया, डॉ निरज देशपांडे

2) सौ. शुभदा भारत मातेचे पाच थोर पुरुष (अमोल प्रकाशन)

3) डी.डी देवरे, डी. एस निकुभ प्रशांत पब्लीकेशन (पुणे) पब्लीकेशन, नागपुर

4) विकिपीडिया